# प्रेसनोट

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे
दि. १५/१२/२०१८

## चित्तरंजन पार्क पोलीस स्टेशन नवी दिल्ली येथील सहायक पोलीस उप निरीक्षकास पंचवीस हजार रूपयांची लाच स्विकारताना रंगेहात पकडले.

---

यातील तक्रारदार यांचे विरूद्ध नवी दिल्ली येथील मेट्रोपोलिटन न्यायालयाकडून प्रोक्लमेशन वॉरंट काढलेले होते. सदर प्रोक्लमेशन वॉरंटची बजावणी करण्यासाठी नवी दिल्ली येथील चित्तरंजन पार्क पोलीस स्टेशन येथील सेंट्रल प्रोसेस पूल विभागातील सहायक पोलीस उपनिरीक्षक यांचेकडे दिले होते. तक्रारदार यांना बजावणी करण्यासाठी नवी दिल्ली येथील सहायक पोलीस उपनिरीक्षक पुणे येथे आले होते. त्यावेळी लोकसेवक लेहरीसिंग यांनी सदरचे प्रोक्लेमेशन वॉरंट तक्रारदार यांना न बजावणीकरीता चाळीस हजार रूपयांची लाचेची मागणी केली होती. सदर बाबत तक्रारदार यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे कार्यालयामध्ये तक्रार नोंदविली.

सदर तक्रारीची दिनांक १५/१२/२०१८ रोजी पडताळणी केली असता, तक्रारदार यांच्या विरुद्ध कोर्टाने काढलेले प्रोक्लेमेशन वॉरंट तक्रारदार यांना न बजावणीकरीता सहायक पोलीस उपनिरीक्षक लेहरीसिंग याने चाळीस हजार रूपयांची लाचेची मागणी करून तडजोडीअंती पंचवीस हजार रूपयांची लाचेची मागणी केली.

त्यावरुन दिनांक १५/१२/२०१८ रोजी सापळा कारवाई केली असता सापळा कारवाईमध्ये लोकसेवक लेहरीसिंग लिलासिंग, वय ५४, सहायक पोलीस उपनिरीक्षक नेमणुक चित्तरंजन पार्क पोलीस स्टेशन सेंट्रल प्रोसेस पुल साऊथ ईस्ट जिल्हा नवी दिल्ली याने तक्रारदार यांचेकडून २५,०००/- रूपयांची लाचेची रक्कम पुणे रेल्वे स्टेशन समोरील हॉटेल होमलँड समोरील रोडवर स्विकारल्यावर त्यास रंगेहात पकडण्यात आले असुन त्याचेवर बंडगार्डन पोलीस स्टेशन, पुणे शहर येथे लाचलुचपत प्रतिबंधक कायद्याप्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई ही मा. पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. संदीप दिवाण यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

शासकीय लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमुद क्रमांकावर सपर्क साधण्याबाबतचे आवाहन श्री. संदीप दिवाण, पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे यांनी केले आहे.

१. <u>हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०६४</u>
२. अॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे -
   दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
३. व्हॉट्स-अॅप क्रमांक पुणे - ७८७५३३३३३३
४. व्हॉट्स-अॅप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
५. ई-मेलआयडी- पुणे **dyspacbpune@mahapolice.gov.in**
६. फेसबुकपेज- **www.facebook.com-maharashtraACB**
७. वेबसाईट- **www.acbmaharashtra.gov.in**

( सुहास नाडगौडा )
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उपअधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे